# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक १४.१०.२०२६ बुधवार

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १३.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण २,०७,०६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण २,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक १३.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १४.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ६८ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०२ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २६२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ११३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ७३ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १२८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०७ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १३ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०६ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९५४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे २५ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,८३६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,२०,७००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा पोलीसांची संयुक्तीक कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द धडक मोहीम.**

**गुन्हेशाखा पोलीसांनी दिनांक १३.१०.२०२६ चे रात्री नागपुर शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाणे हद्दीतील अवैध हुक्का पार्लरवर धाड कारवाई करून, एकुण २० हुक्का पार्लर चेक केले. त्यापैकी ०२ हुक्का पार्लर अवैधरित्या चालु मिळाल्याने त्यांचेवर पोलीस ठाणे सिताबर्डी व अंबाझरी येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वरील धडक मोहीम यापुढेही सतत सुरू राहणार आहे.**

**अ)** दिनांक १३.१०.२०२६ चे २०.३० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत वेस्ट हायकोर्ट रोड, शंकर नगर चौक धरमपेठ, आनंद भंडार रेस्टॉरेन्ट बिल्डींगमधील पहिल्या माळ्यावरील 'फ्युजन

कॅफे' येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी १) विक्रांत भगवत शिंदे वय २७ वर्ष रा. प्लॉट नं. ०७, रॉय टाऊन ०२, ईसासनी, नागपूर २) शुभम सुनिल वैद्य वय २४ वर्षे, रा. जुनी वस्ती, खामला सम्यक बुध्द विहाराजवळ, राणाप्रतापनगर, नागपूर हे ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता संगणमताने अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य तसेच रोख असा एकुण ३२,५०५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम २७२ भा.न्या.सं. सहकलम ४(अ),५,७,२०,२१,२४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ सहकलम ३३,१३१ मपोका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक १३.१०.२०२६ चे १८.१५ वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत गांधीनगर हिल रोड येथील '९ लाऊंज हुक्का पार्लर' येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी मालक १) अभिषेक शिखरचंद जैन, वय ४१ वर्षे, रा. परवारपुरा, जैन मंदीर जवळ, ईतवारी, नागपूर २) मॅनेजर नामे निखील संजय खोब्रागडे, वय ३७ वर्षे, रा. रूद्र अवतार प्रेस जवळ, धरमपेठ, नागपूर ३) वेटर नामे रूपेश कृष्णराव वानखेडे, वय ३० वर्षे, रा. गांधीनगर, नागपुर हे संगणमताने ईतर १० ग्राहक आरोपींना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता संगणमताने अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य तसेच रोख असा एकुण १५,३७०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम २७२ भा.न्या.सं., सहकलम ४,४(अ),७,८,२०,२१,२१(अ) सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम— २००३ व महाराष्ट्र सुधारणा अधिनियम—२०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर आणि पोनि. दर्शन पाटील तसेच, त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.





**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे ईमामवाडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी जितेंद्र वामनराव गोमासे, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं. २३१, दर्शन कॉलोनी, नंदनवन, नागपुर हे ईलेक्ट्रीक कंत्राटदार म्हणुन कामे करतात. त्यांचे टि.बि. वार्ड येथील एचओडी क्वॉर्टर येथे ईलेक्ट्रीक फिटींगचे काम सुरू आहे. ईमारतीचे पहील्या माळ्यावरील एका बंद खोलीत ईलेक्ट्रीक फिटींगसाठी लागणारे साहीत्य ठेवलेले होते. दिनांक १३.१०.२०२६ चे १२.०० वा. १६.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने ईलेक्ट्रीक फिटींगचे साहीत्य ठेवलेल्या रूमचे दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, वेगवेगळ्या एम.एम. चे ईलेक्ट्रीक कॉपर वायर बंडल एकुण किंमती २,६७,२९४/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. प्रविण लाखनकर ९६०४४००६९९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १३.१०.२०२६ चे २२.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती रोड, वाडी उड्डाणपुल येथे दुचाकी गाडी क्र. एम.एच ४९ सि.व्ही ३३०० चा चालक नामे आश्रय डागा याने त्याचे ताब्यातील दुचाकी डबलसिट भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन दुसऱ्या दुचाकी गाडी क्र. एम.एच ३० क्यु ३६३५ ला धडक देवुन, त्याचा चालक मिलींद काशीनाथ गायधने, वय ६० वर्षे, रा. वाडी, नागपुर यांचे गंभीर जखमी होण्यास तसेच, स्वत:चे व त्याचे सोबत मागे बसलेला त्याचा यश नावाचा मित्राचे गंभीर जखमी होण्यास कारणीभुत होवुन, सुराबर्डी, अमरावती रोडकडे जाणारे फिर्यादी यांचे चारचाकी एमजी विंडसर कार क्र. एम.एच ४९ सि.एल ५६६२ ला मागुन धडक देवुन कारचे नुकसान केले. गंभीर जखमी मिलींद गायधने यांना उपचाराकरीता लक्ष हॉस्पीटल व तेथुन एरीस हॉस्पीटल, सिताबर्डी येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. जखमीं यश व आरोपीचा उपचार किंग्सवे हॉस्पीटल येथे सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी आदीत्य दिपक खंडेलवाल, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. २०४, जय सिताराम कॉम्प्लेक्स, लकडगंज, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे सपोनि. कुणाल धुरट यांनी दुचाकी क्र. एम.एच ४९ सि.व्ही ३३०० चे चालकाविरूध्द कलम १०६(१),१२५(ब),२८१,३२४ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** फिर्यादी रामविलास रवि झारीया, रा. मांगाबेली, तह. बिछीया, जि. मंडला मध्य प्रदेश यांनी पोलीस ठाणे बेलतरोडी येथे तक्रार दिली की, त्यांचे सोबत गावावरून कामाकरीता आलेला ईसम नामे अनिल अमृतलाल झारीया, वय ३२ वर्षे, रा. ह.मु.— बेलतरोडी महालक्ष्मी नगर, नागपुर हे दिनांक १५.०९.२०२६ चे ०८.०० वा. पासुन आपले घरी मांगाबेली, तह. बिछीया, जि. मंडला मध्य प्रदेश येथे जाण्याकरीता निघाला होता. तो अद्याप गावी घरी पोहचला नसुन, परत आलेला नाही. शोध घेतला असता, मिळून आले नाही. बेपत्ता आहे. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भान्यासं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ५ इंच, केस—काळे, अंगात—लाल काळ्या रंगाची टी—शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले आहे. भाषा—हिंदी बोलतात.


अनिल

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.